# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

### <u>आरोग्य विभागांतर्गत उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर अंतर्गत गट क संवर्ग पदभरती २०१६ - दुसरी निवड यादी प्रसिध्द करणे व दुसरी समुपदेशन फेरी आयोजित करणेबाबतची सूचना</u>

उपसंचालक आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर यांच्या अधिनस्थ गट क मधील ९ संवर्गातील पदभरतीची लेखी परिक्षा दि. २०/०५/२०१८ रोजी घेण्यात आलेली होती. सदर परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याकिरता पहिली समुपदेशन फेरी दि.१७/१२/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर समुपदेशन फेरीस अनुपस्थित असलेले उमेदवार तसेच कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरलेले उमेदवार यामुळे रिक्त राहिलेली पदे भरण्याकरिता दुसरी निवड आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in व मे.महाऑनलाईन संस्थेच्या maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

निवड झालेल्या उमेदवारांकरिता दुस-या समुपदेशन फेरीचे आयोजन प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण केंद्र, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैदयकीय महाविदयालयाशेजारी, आर.के.नगर रोड, शेंडापार्क, कोल्हापूर,पिन कोड- ४१६ ०१३ (दूरध्वनी क्र.०२३१ २६९३४८०) येथे दि.०३/०९/२०१९ ते दि. ०७/०९/२०१९ या कालावधीत आयोजित करण्यात येईल. समुपदेशन प्रक्रियेबाबत उमेदवारांना उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर कार्यालयामार्फत स्वतंत्र पत्रान्वये कळविण्यात येईल. तथापि समुपदेशनाच्या सूचना विहित वेळेत प्राप्त न झाल्यास निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रासह समुपदेशनाच्या दिवशी वर नमूद केलेल्या पत्त्यावरील कार्यालयात उपस्थित राहावे.

सहसंचालक, आरोग्य सेवा,
(प्रशासन) मुंबई

ठिकाण : मुंबई
दिनांक : २२/०८/२०१९